# धुळे महानगरपालिका

जा.क्र./धुमपा/नर/ 83
दिनांक:- 12.05.2026

**विषय:-** धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे देवपूर येथील सुशी नाल्यातील अतिक्रमणधारकांना निवास योजनांचा लाभ देण्याबाबत.

**जाहीर सूचना**

धुळे महानगरपालिका हद्दींतील मौजे देवपूर सर्व्हे क्र. 114,115,29,32 व 33 या सर्व्हे नं. लगत असलेल्या सुशीनाल्यात असलेली अतिक्रमणे आपत्ती व्यवस्थापनासाठी निष्कासित करण्यात आली आहेत.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करणेकामी समितीच्या दि.06.05.2026 रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसारअतिक्रमणधारक यांना प्रधानमंत्री आवास योजना/ शबरी आवास योजनेचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने धुळे महानगरपालिकेमार्फत पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना अथवा शबरी योजनेचा लाभ देण्यासाठी दि.15/05/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

ज्या व्यक्तीना या शिबिराचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी या वेळेत खालील कागदपत्रासह धुळे महानगरपालिका मुख्यालय येथील स्व.अटल बिहारी वाजपेयी सभागृहात उपस्थित रहावे.या शिबिरानुसार घरकुलासाठी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

| प्रधानमंत्री आवास योजना कागदपत्रे | शबरी आवास योजना कागदपत्रे |
|---|---|
| अतिक्रमणधारकांचे आधार कार्ड | अतिक्रमणधारकाचे नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो |
| अतिक्रमणधारकांचे रेशन कार्ड | रहिवासी प्रमाणपत्र |
| अतिक्रमणधारकाच्या कुटुंबातील सर्वांचे आधार कार्ड /रेशन कार्ड वर नाव असलेल्या सर्व सदस्यांचे आधार कार्ड | जमातीचे प्रमाणपत्र |
| अतिक्रमणधारकाचे आधारकार्डला लिंक असलेले बँक पासबुक XEROX | घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे किंवा नाही यासाठीचा पुरावा |
| तहसील कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला | उत्पन्नाचा दाखला (तहसील कार्यालयाचा ) |
| अतिक्रमणधारकाचे PAN कार्ड | शिधा पत्रिका |
| SC/ST/OBC असल्यास जात प्रमाणपत्र | आधारकार्ड |
| जमीन दस्तावेज- चालू तारखेचा 7/12 उतारा किंवा सिटी सर्वे उतारा/ मालमत्ता कराच्या पावत्या. | एक रद्द केलेला धनादेश अथवा बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. |

**विशेष सूचना** — वर नमूद जागांच्या बाबतीत मा. न्यायालीन निर्देशांचे पालन करून घरकुलाचा लाभ उपलब्ध करून देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(नितीन कापडणीस)
**आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**

दिनांक-१३/०५/२०२६
ठिकाण - धुळे